# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित
# (महानिर्मिती)

(प्लॉट क्र.जी-९, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१)
वेबसाईट: www.mahagenco.in

## जाहीर सूचना

महाराष्ट्र राज्य वीजनिर्मिती कंपनी; संचालन व सुव्यवस्था करीत असलेल्या जलविद्युत केंद्रांसाठी महाराष्ट्र शासनाने सुधारित केल्याप्रमाणे पट्टाभाडयास मंजुरी मिळण्यासंबंधी महानिर्मिती यांच्या विनंतीअर्जावर सूचना / अभिप्राय.

— — — —

महानिर्मिती यांनी, त्यांच्याकडून संचालन व सुव्यवस्था करण्यात येत असलेल्या जलविद्युत केंद्रांबाबतीत महाराष्ट्र शासनाने सुधारित केल्याप्रमाणे पट्टाभाडयास मंजूरी मिळावी याकरिता विनंतीअर्ज सादर केलेला आहे. या प्रकरणी सुनावण्या घेतल्यानंतर आणि महानिर्मिती व महाराष्ट्र शासन - जलसंपदा (WRD) यांनी संबंधित माहिती व आधारसामग्री सादर केल्यानंतर आयोगाने त्यापुढील सुनावणीसाठी विनंतीअर्ज दाखल करुन घेतला आहे आणि महानिर्मिती यांना या जाहीर सुचनेद्वारे जनतेकडून अभिप्राय / सूचना मागवाव्यात, असे निर्देश दिले आहेत.

२. स्वारस्य असणाऱ्या व्यक्तींना खालील दस्तऐवजांच्या प्रती (प्रत्येकी रु.१००/- या किंमतीस) महानिर्मिती यांचे मुख्य कार्यालय, तसेच, परिमंडल कार्यालये येथे मिळू शकतील.

क) महानिर्मिती यांचा २५ मे २००७ रोजीचा विनंतीअर्ज
ख) महाराष्ट्र शासन - जलसंपदा विभाग यांनी २ ऑगस्ट २००७ रोजी केलेले अतिरिक्त सादर निवेदन.
ग) महानिर्मिती यांचे अतिरिक्त सादर निवेदन, दिनांक १८ ऑगस्ट २००७.
घ) महाराष्ट्र शासन - जलसंपदा विभाग यांचे १० सप्टेंबर २००७ चे अतिरिक्त सादर निवेदन

मुख्य कार्यालय : अधिक्षक अभियंता (निर्मिती)
नियामक कक्ष, म.रा.वीज निर्मिती कं.मर्यादित
३रा मजला, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व)
मुंबई - ४०० ०५१

अन्य ठिकाणची कार्यालये :

१. मुख्य महाव्यवस्थापक, वायुविद्युत केंद्र, उरण
२. मुख्य महाव्यवस्थापक, महाऔष्णिक विद्युत केंद्र, दुर्गापूर चंद्रपूर

३. मुख्य महाव्यवस्थापक, औ.वि.केंद्र, कोराडी (नागपूर)
४. मुख्य महाव्यवस्थापक, औ.वि.केंद्र, खापरखेडा (नागपूर)
५. मुख्य महाव्यवस्थापक, औ.वि.केंद्र, परळी (जि.बीड)
६. मुख्य महाव्यवस्थापक, औ.वि.केंद्र, दीपनगर, भुसावळ
७. मुख्य महाव्यवस्थापक, औ.वि.केंद्र, एकलहरे (नाशिक)
८. महाव्यवस्थापक, औ.वि.केंद्र, पारस (जि.अकोला)
९. अधिक्षक अभियंता (निर्मिती) लघु जलविद्युत मंडल,९२५ कसबा पेठ, पुणे
१०.महाव्यवस्थापक (चाचणी,उपकरण योजना व नियंत्रण), विद्युत भवन, काटोल रोड नागपूर.

३. सूचना / अभिप्राय यांच्या प्रती; सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, तेरावा मजला, केंद्र क्रं.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५ (फॅक्स ०२२-२२१६३९७६; ई.मेल. mercindia@mercindia.org.in) यांना (एक प्रत अर्जदार महानिर्मिती यांना पाठवल्याच्या पुराव्या सहित) १९ मार्च २००८ पर्यंत मिळतील अशा बेताने पाठवाव्यात.

४. आक्षेप आणि / अथवा सूचना / अभिप्राय पाठवणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने इंग्रजीत किंवा मराठीत चार प्रती पाठवाव्यात. सूचना / अभिप्राय पाठवणाऱ्याने आपले संपूर्ण नाव, संपर्क पत्ता आणि असल्यास ई-मेल पत्ता नमूद करावा. सूचना / अभिप्राय एखाद्या ग्राहकवर्ग संघटनेतर्फे देण्यात येत असल्यास तसे नमूद करावे. तसेच, संबंधितास आयोगाने त्याचे म्हणणे ऐकूण घ्यावे अशी इच्छा असल्यास तसे नमूद करावे. अशा व्यक्तिस आयोगाकडून : आयोगाचे कार्यालय तेरावा मजला, केंद्र क्रं.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५ येथे मंगळवार, दिनांक १५ एप्रिल २००८ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सुनावणी प्रसंगी संधी देण्यात येईल व त्याकरिता वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

५. प्रत्येक आक्षेप / सूचना / अभिप्राय यांना, प्राप्त झाल्यापासून सात दिवसांत परंतु १९ मार्च २००८ पर्यंत प्राप्त होणाऱ्या सर्व आक्षेप / सूचना / अभिप्रायांस महानिर्मिती यांच्याकडून २८ मार्च २००८ पर्यंत उत्तरे देण्यात येतील.

६. तपशिलावार विनंतीअर्जाचे दस्तऐवज महानिर्मिती यांच्या "www.mahagenco.in" या वेबसाईटवर विनामूल्य उतरवून घेण्यासाठी उपलब्ध आहेत.

सही /—

नाव (श्री. मधुकर शेलार)
संचालक, संचलन, महानिर्मिती

दिनांक : १५/०२/२००८
मुंबई